# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर

डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)

दि. 06/09/2017

<u>प्रेस नोट</u>

## *"चिली ड्रोन कॅमेरा" एक अभिनव उपक्रम*

3 इडीएटस् या चित्रपटात आपण सर्वांनी रॉन्चो ला (आमिरखान) "ड्रोन" उडविताना पाहिले आहे. औरंगाबाद शहराचे पोलीस आयुक्त यशस्वी यादव यांनी अश्याच ड्रोन कॅमेऱ्यांना नाविन्यपूर्ण उपकरणाची जोडणी करून त्यांचा वापर कायदा व सुव्यवस्थेचे परिस्थितीत व वाहतूक नियमनासाठी करण्याची संकल्पना मूर्त स्वरुपात आणली आहे. दि. 05/09/2017 रोजी गणेश विसर्जन मिरवणुकीचे औचित्य साधून विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे व खासदार चंद्रकांत खैरे यांचे हस्ते "चिली ड्रोन कॅमेरा" या पथदर्शी प्रकल्पाचे (Pilot Project) चे उद्‌घाटन करण्यात आले.

औरंगाबाद शहर हे एक संवेदनशील शहर म्हणून ओळखले जाते. मोर्चे, आंदोलने, जातीय तणावाचे प्रसंगामुळे बेकायदेशीर जमावाकडून सार्वजनिक मालमत्तांची हानी झाल्याच्या घटना शहरात पूर्वी घडलेल्या आहेत. अशा प्रकारचे बेकायदेशीर जमाव पांगविण्याकरिता पोलिसांना बळाचा वापर करावा लागतो. अश्रुधूर, लाठीचार्ज प्रसंगी गोळीबार करून जमाव पांगवावा लागतो. या प्रकारे जमाव पांगविताना जमावातील लोकांना गंभीर दुखापाती होतात. काहीवेळा जीवित हानी देखील होते. पोलिसांसाठी देखील हि परिस्थिती घातकच असते. जमावाकडून होणारी दगडफेक व हिंसाचारात पोलिसांना गंभीर दुखापती व प्राणहानीचा सामना करावा लागलेला आहे. लाठीचार्ज व बळाचे वापरामुळे पोलिसांना देखील चौकशी व कायदेशीर अडचणींना सामोरे जावे लागते.

बेकायदेशीर जमावास पांगविण्याचे जुन्या पद्धती मधील त्रुटींचा विचार करून पोलीस आयुक्त यशस्वी यादव यांनी ड्रोन कॅमेऱ्याद्वारे मिरची पावडरचा वापर करून बेकायदेशीर जमावास पांगविण्याचे उपाय करण्याचे ठरविले होते. नेहमीच्या वापरातील ड्रोन कॅमेऱ्यांना एक नाविन्यपूर्ण उपकरणाची जोडणी करून त्याद्वारे बेकायदेशीर जमावावर मिरची पूड व मिरची स्प्रे चा मारा करून जमावाला पांगविण्याचे तंत्र या चिली ड्रोन कॅमेऱ्यामध्ये वापरण्यात आले आहे.

चिली ड्रोन कॅमेऱ्याचा वापर दुरस्थ नियंत्रणाद्वारे करण्यात येत असल्याने बेकायदेशीर जमावातील समाज कंटकांचा गट हेरून त्यांचे चित्रीकरण करून त्यांच्यावर मिरची पुडचा मारा करण्यात येत असल्याने यामुळे जमावातील लोकांना किवा पोलिसांना अशा प्रसंगाचे वेळी होणाऱ्या गंभीर दुखापती व प्राणहानी टाळता येणे शक्य आहे. ड्रोन कॅमेऱ्याद्वारे केलेले चित्रीकरण न्यायालयात महत्वाचा पुरावा ठरेल व गुन्हा दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्यास मदत होणार आहे.

या ड्रोन कॅमेऱ्याचा केवळ हाच एक उपयोग नव्हे तर इतर वेळी हे ड्रोन कॅमेरा वाहतूक नियामनाकरिता उपयोगी पडणार आहे. महत्वाचे चौकात होणारी वाहतुकीची कोंडी सोडविण्याकरिता या ड्रोन कॅमेऱ्याचा वापर होणार आहे. चिली ड्रोन कॅमेरा कार्यान्वित करण्यापूर्वी पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर स्वतः पोलीस आयुक्त यशस्वी यादव यांनी वेळोवेळी त्यांचे यशस्वीरीत्या प्रात्यक्षिक घेण्यात आले आहे.

या चिली ड्रोन कॅमेऱ्याबाबत माहिती देताना पोलीस आयुक्त यशस्वी यादव यांनी सांगितले कि, औरंगाबाद शहर पोलीस दलाचा हा एक महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. अशा प्रकारचे ड्रोन देशभरात प्रथमच औरंगाबाद शहर पोलिसांकडून वापरण्यात येत आहे. ही एक नाविन्यपूर्ण संकल्पना असून या चिली ड्रोन कॅमेऱ्याचे पेटंट देखील नोंदणीकृत करण्यात आले आहे. याचे वापरामुळे बळाचा वापर टाळून बेकायदेशीर जमावास पांगविणे पोलिसांना शक्य होणार असल्याने अशा परिस्थितीत पोलिसांवरील ताण कमी होणार आहे.

काल दि. 05/09/2017 रोजी या पायलट प्रोजेक्टचे उद्घाटन गणपती विसर्जनाच्या दिवशी संस्थान गणपती या ठिकाणी विधानसभेचे अध्यक्ष हरिभाऊ बागडे व औरंगाबाद चे खासदार चंद्रकांत खैरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ड्रोन कॅमेऱ्यामधून शहराचा पहिला मानाचा गणपती यांच्या रथावर पुष्प वृष्टी व गणेश भक्तावर अत्तरांचा वर्षाव करून करण्यात आली. सुरुवातीपासून शेवटपर्यंत विसर्जन मिरवणुकीवर ड्रोन कॅमेऱ्याच्या सहाय्याने सतत लक्ष ठेवण्यात आले. यामुळे यंदाच्या विसर्जन मिरवणुकीमध्ये कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. चिली ड्रोन कॅमेऱ्याची निर्मिती ही पोलीस आयुक्त यशस्वी यादव यांची अभिनव संकल्पना असून त्याचे पेटंट सुद्धा नोंदणीकृत करण्यात आले आहे.

स्वाक्षरीत /-
(रामेश्वर थोरात)
सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे)
औरंगाबाद शहर